# २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

असोसिएशनची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा "अभियंता भवन", आकुर्ली, पनवेल जि.रायगड येथे दि.२९ जानेवारी २०२२ रोजी संपन्न झाली. त्या सभेचा इतिवृत्तांत खालीलप्रमाणे -

**सभेची नोटीस**

असोसिएशनची नियमावली क्र.8 (A) अन्वये, एस.ई.ए. च्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीस बरोबर प्रसारीत करणेत आली. तसेच जास्तीत जास्त सभासदांच्या माहितीसाठी असोसिएशनच्या वेब साईटवर व एस.ई.ए. च्या वेब साईटवर सुध्दा टाकण्यात आली होती.

**गणसंख्या**

घटनेच्या नियमावली क्र.[8(b)-ii] अन्वये पुरेशी गणसंख्या नसलेने, अध्यक्षांनी सभा तहकूब करण्यात आलेचे सांगितले आणि खालील ठराव सभागृहापुढे मंजूरीसाठी ठेवण्यात आला.

## ठराव

**<u>ठराव -१</u>**

घटनेतील नियमावली क्र.[8(b)-ii] अन्वये पुरेशी गणसंख्या नसलेने सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करणेत यावी व अर्ध्या तासानंतर उपस्थित गणसंख्येवर याच ठिकाणी सभा पुनःश्च सुरु करणेत यावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूचक | : | श्री. आशिष मेहता | अध्यक्ष | (सांगली) |
| अनुमोदक | : | श्री. संजय ठाकूर | विश्वस्त | (पनवेल) |

**<u>“ठराव सर्वानुमते मंजूर”</u>**

वरील मंजूर ठरावानंतर अध्यक्षांनी सभेचे कामकाज सुरु करीत असलेचे सांगितले. तत्पूर्वी इंजि. पृथ्वीराज शिंदे, सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

**विषय क्र.१ : अहवाल वाचन**

अहवाल वाचन, विषय क्र.१ सुरु करणेपूर्वी मागील दोन वर्षात दिवंगत झालेले सभासद, बिगर सभासद व सन्माननीय व्यक्तीस, दोन मिनिटे स्तब्धता पाळून आदरांजली वाहिली.

| | |
|---|---|
| १) कै. अतुल शरदराव देशपांडे | बारामती |
| २) कै. शिवराम कल्लाप्पा चिकोडे | सांगली |
| ३) कै. धनंजय दिगंबर मंडलीक | नाशिक औरंगाबाद केंद्र |
| ४) कै.अरविंद आप्पासो डुबल | रत्नागिरी (सांगली) |

५) कै. सुखदेव नारायणराव शेरेकर मुंबई

६) कै. अभय आप्पासो पाटील ठाणे

७) कै. अरुण महादेव मोडेकर कोल्हापूर

८) कै. वैभव सुदाम जठार सातारा

९) कै. सरदार पाडूरंग चौगुले कोल्हापूर

वरील भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित केलेनंतर अध्यक्षांनी सभेचे कामकाज सुरु केले.

अहवाल वाचनामध्ये प्रामुख्याने सभेची नोटीस, सभासद संख्या, सदस्यापासून वंचित असलेल्या अभियंत्याबाबतची माहिती, उद्दिष्टापूर्तीची वाटचाल, प्रलंबित प्रकरणे, दुर्धर आजाराच्या उपचारासाठी देण्यात आलेल्या आर्थिक मदतीचा तपशील, शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक योजना, वैद्यकीय तपासणी शिबिराचे महत्व व झालेल्या शिबिरांची माहिती, असोसिएशनच्या नविन अद्यावत वेब साईटबाबतची माहिती, नामनिर्देशनाचे महत्व व त्याची यादी विश्वस्त मंडळाच्या सभा व घेण्यात आलेले निर्णय, लेखापरिक्षण सन २०१९-२० व २०२०-२१, आयकर सवलत, निवृत्त अभियंत्यांचा तपशील इत्यादी बाबींची सखोल व

सविस्तर माहिती अहवाल वाचनामध्ये प्रामुख्याने समाविष्ठ करणेत आली, यावर सभागृहाने समाधान व्यक्त केले.

सदर अहवाल वाचना दरम्यान, सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक समर्पक उत्तरे अध्यक्षांनी दिली.

तसेच नव्यानी रुजू झालेल्या तिन्हीही कंपनीमधील, अभियंत्यांना, असोसिएशनचे सभासद होणेबाबत विनंती करणेत आली.

**विषय क्र.२ : सन २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षाचा चा हिशोब सादर करणे.**

सन २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट जे आपले अंतर्गत तपासनीस जि.एन.अनगळ ॲन्ड को., पुणे यांनी प्रमाणित केलेले आहेत ते सभागृहापुढे इंजि.पृथ्वीराज शिंदे, सचिव यांनी सादर केले व त्याचे वाचन केले. तसेच सदर ऑडीट रिपोर्टस यापूर्वीच असोसिएशनच्या वेब साईटवरसुध्दा प्रसारीत केलेचे सांगितले. सदर रिपोर्टसना सभागृहाने अनुमती दर्शविली.

**विषय क्र.३ : मागील व चालू (सन २०२०-२१ व २०२१-२२) या दोन वर्षासाठी ऑडीटरची नेमणूक व त्यांचे मानधन ठरविणे.**

सदर विषयावर खालील ठराव मंजूरीसाठी मांडण्यात आला, त्यास सभागृहानी सर्वानुमते मंजूरी दिली.

## ठराव

**ठराव -२**

सन २०२०-२१ व २०२१-२२ सालासाठी, अंतर्गत तपासनीस (ऑडीटर) म्हणून मे.जि.एन्. अनगळ ॲन्ड को., पुणे यांची नेमणूक करणेत यावी व त्यांचे मानधन ठरविणेचे अधिकार, विश्वस्त मंडळास देण्यात यावे.

सूचक : श्री. देविदास बैकर सदस्य, पनवेल

अनुमोदक : श्री. कमलेश परदेशी सदस्य, कल्याण

**“ ठराव सर्वानुमते मंजूर ”**

**विषय क्र.४ : पुढील वर्षासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे. (सन २०२२-२३)**

सन २०२२-२३ साठीचे, विश्वस्त मंडळाच्या सभेमध्ये सर्वानुमते मंजूर / शिफारस केलेले अंदाजपत्रक जे २५ व्या वार्षिक अहवालामध्ये पान क्र.३१ वर देणेत आलेचे सांगितले. सदर अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबत विनंती केली. यावर सभागृहात चर्चा होऊन खालील ठराव मंजूरीसाठी मांडण्यात आला.

## ठराव

**ठराव -३**

सन २०२२-२३ सालासाठीचे अंदाजपत्रक जे २५ व्या वार्षिक अहवालात पान क्र.३१ वर प्रसारीत करणेत आले आहे. त्यास मंजूरी द्यावी.

सूचक : श्री. आशिष मेहता अध्यक्ष सांगली

अनुमोदक : श्री. प्रशांत चिकनिस उपाध्यक्ष कोल्हापूर

**“ठराव सर्वानुमते मंजूर”**

**(मंजूर अंदाजपत्रक, इतिवृत्ताच्या शेवटी देण्यात आले आहे)**

**विषय क्र.५ : घटनेमध्ये दुरुस्ती विषयक चर्चा**

सभेच्या नोटीसीमध्ये विषय क्र.५ अन्वये घटना दुरुस्तीबाबतचे / नियमावली दुरुस्ती बाबतचे प्रस्ताव सादर करणेचे आवाहन करणेत आले होते, परंतु याबाबतचा कोणताही प्रस्ताव मुख्यालयास प्राप्त न झालेचे, अध्यक्षांनी सभागृहाला सांगितले.

**विषय क्र.६ : पनवेल येथील अभियंता भवनबाबत**

सदर विषयावर इंजि. संजय ठाकूर-पनवेल यांनी सविस्तर माहिती सभागृहाला दिली, किरकोळ कामे वगळता, सर्व बिल्डींगचे काम पूर्ण झालेचे सांगीतले.

सदर बिल्डींगचे, दैनदिन कामकाज, लाईट बील, पाणी बिल, केअर टेकरचे मानधन इत्यादी बाबीसाठी लागणारी रक्कम अंदाजे ४०,०००/- प्रति महिना (जी फिक्सड डिपॉझीट वरील व्याजा मधून करणेचे ठरले होते) ती अपुरी पडत असलेचे सांगीतले, यावर सभागृहात चर्चा होऊन, पुढील मिटींग मध्ये निर्णय घेणेचे ठरले.

तसेच सभासदांना राहण्याबातचे नियम शुल्काची रक्कम याचा निर्णय बिल्डींग कमिटीच्या मिटींगमध्ये लवकरच घेणेत येईल असे सांगीतले.

अध्यक्ष अशिष मेहता यांनी पूर्वीच्या मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे (रु.४०,००,०००/-) (रुपये चाळीस लाख) पैकी रु.३०,००,०००/- (रुपये तिस लाख)रक्कम अदा करण्यात आलेचे सांगितले व उर्वरित रक्कम रु.१० लाख समिती कडून कळविल्यास ती त्वरीत अदा करणेचे आश्वासन दिले. यापुढील काळात निवृत्त होणाऱ्या सभासदांची ठेव रक्कम सदर इमारतीसाठी वर्ग करणेबाबत चर्चा होवून दरवर्षी परिस्थितीचा आढावा घेऊन त्याप्रमाणे निर्णय घेणेचे ठरले.

**विषय क्र.७ : विश्वस्ताची निवड (पुढील पाच वर्षासाठी)**

सदर विषयावर सभागृहात चर्चा झालेवर, अध्याक्षांनी या विषयावर खालील ठराव सभागृहापुढे मांडला.

## ठराव

**ठराव -४**

खालील विश्वस्तांची पुढील पाच (५) वर्षासाठी नेमणूक करणेत यावी .

| अ.क्र. | नांव | गांव |
|---|---|---|
| १) | **इंजि. आशिष जयंत मेहता** | **सांगली** |
| २) | **इंजि. प्रशांत गणपतराव चिकनिस** | **कोल्हापूर** |
| ३) | **इंजि. पृथ्वीराज भगवान शिंदे** | **सांगली** |
| ४) | **इंजि. उज्वल सुधाकरराव गावंडे** | **अमरावत्ती** |
| ५) | **इंजि. संजय गणेश ठाकूर** | **पनवेल** |
| ६) | **इंजि. केदार आनंदराव रेळेकर** | **पुणे** |
| ७) | **इंजि. नविनचंद्र अरविंद वैद्य** | **पुणे** |
| ८) | **इंजि. अशोक विठ्ठलराव गडदे** | **लातूर** |
| ९) | **इंजि. निलेश सुरेश पाटील** | **सांगली** |

सूचक : इंजि. रविंद्र नहिदे सदस्य - कल्याण

अनुमोदक : इंजि. पराग चौधरी सदस्य - जळगांव

**“ठराव सर्वानुमते मंजूर”**

**विषय क्र.७ : विश्वस्ताची पदनिश्चिती घटने मधील नियमावली क्र. 11-(b) अन्वये**

वरील उपरोक्त ठराव मंजूरीनंतर निवड झालेल्या विश्वस्तांनी आपापसात व ऑनलाईन वरील उपलब्ध विश्वस्तांशी चर्चा करुन खालील प्रमाणे पदनिश्चितीचा ठराव मांडण्यात आला.

## ठराव

**ठराव - ५ खालील विश्वस्तांच्या पदनिशितीचा ठराव मंजूरी साठी सादर करणेत आला**

विश्वस्तांची नांवे व पदनिश्चिती.

| अ.क्र. | पद | नांव | गांव |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | इंजि. आशिष जयंत मेहता | सांगली |
| २) | उपाध्यक्ष | इंजि. प्रशांत गणपतराव चिकनिस | कोल्हापूर |
| ३) | सचिव | इंजि. पृथ्वीराज भगवान शिंदे | सांगली |
| ४) | खजिनदार | इंजि. उज्वल सुधाकरराव गावंडे | अमरावत्ती |

सूचक : इंजि. केदार रेळेकर विश्वस्त - पुणे

अनुमोदक : इंजि. संजय ठाकूर विश्वस्त - पनवेल

**“ठराव सर्वानुमते मंजूर”**

**विषय क्र.८ : अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेला येणारे विषय**

**विषय क्र.८(अ) : असोसिएशनची नियमावली क्र. 11-(A) अन्वये स्वीकृत विश्वस्ताची नेमणूक करणे.**

सदर विषयावर खालील ठराव मंजूरीसाठी मांडला.

## ठराव

**ठराव - ६**

पुढील म्हणजे २६ व्या वार्षिक साधारण सभेपर्यंत खालील अभियंत्यांची स्वीकृत सभासद म्हणून निवड करणेत यावी.

१) इंजि. अरुण बापूराव गित्ते परळी औ. केंद्र

२) इंजि. संतोष सुरेश खुमकर अकोला

सूचक : इंजि. पृथ्विराज शिंदे सचिव, सांगली.

अनुमोदक : इंजि. केदार रेळेकर विश्वस्त, पुणे.

**“ठराव सर्वानुमते मंजूर”**

वरील ठरावानंतर, मावळते स्विकृत सदस्य इंजि पराग चौधरी याचा शाल, श्रिफळ देऊन सत्कार करण्यात आला व इंजि. सतिश शेळके जे ऑन लाईनवर उपस्थित होते. त्यांनाही सदर सत्काराबाबत सांगीतले.

**आभार -**

अध्यक्षांनी विषयपत्रिकेवरील सर्व विषय संपलेचे सांगितले, इंजि. प्रशांत चिकनिस, उपाध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे, ४८ व्या वार्षिक अधिवेशन समितीचे अध्यक्ष व कार्यकारी कमिटीचे, सदस्य इतर प्रत्यक्ष उपस्थित व ऑनलाईन वर जॉईन झालेले सर्व सभासदांचे विश्वस्तां मंडळाच्या वतीने आभार मानले.

अशा तऱ्हेने, स्वतःच्या वास्तु मध्ये इतिहासात पहिल्यादा, झालेली २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरण संपन्न झाली.

(पुढील पानावर अंदाजपत्रक बजेट २०२२-२३ ची प्रत जोडली आहे)

सही

**''अभियंता भवन'' पनवेल** **(अशिष मेहत्ता)**

**दि.२९ जानेवारी २०२२** **अध्यक्ष**